सकाळ दि० 02/11/15

# विद्यापीठे स्वायत्तच असावीत

## शिक्षणमंत्री तावडे : अमरावती विद्यापीठात परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. १ : शहराच्या विकासासाठी विकास आराखडा तयार केला जातो; तसा तो शिक्षणासाठीही असावा. विद्यापीठांना भरपूर स्वायत्तता असावी. त्यानुसारच ती चालावीत. हा मुख्य केंद्रबिंदू ठेवून नव्या विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यात आल्याचे उच्च तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सांगितले.




**अमरावती : विद्यापीठात आयोजित परिसंवादात मार्गदर्शन करताना शिक्षणमंत्री विनोद तावडे.**

### परीक्षांवर बहिष्कार नकोच

**गतवेळी प्राध्यापक मंडळींनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलनाचा केंद्रबिंदू परीक्षा ठरवून विद्यार्थ्यांना वेठीस धरले होते; आता मात्र असे चालणार नाही. परीक्षांवर बहिष्कार नकोच. आपण प्राध्यापक संघटनांशी केव्हाही चर्चा करण्यास तयार आहोत, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी आवर्जून सांगितले.**

प्रस्तावित 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१५'वर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात परिसंवाद आयोजित केला. या वेळी ते बोलत होते. मंचावर पालकमंत्री प्रवीण पोटे, आमदार डॉ. सुनील देशमुख, शिक्षण संचालक धनराज माने, कुलगुरू डॉ. मोहन खेडकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख, आनंद मापोदकर, राजेश पांडे, अपूर्वा पालकर कुलसचिव डॉ. अजय देशमुख आदी उपस्थित होते.

२०११ मध्ये मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू निगवेकरांनी या नव्या विद्यापीठ कायद्याचे प्रारूप बनविले होते. ते कुलगुरू राहिलेले आहेत. त्यांनी कायद्याचा मसुदा तयार केला होता. त्यामुळे त्यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या या मसुद्यावर संशय असण्याचे कारण नाही. परंतु, रोगापेक्षा औषध जहाल नको; म्हणून लोकशाही पद्धतीने यात काही रचना करता येईल काय? कारण विद्यापीठाचे कायदे हे तब्बल २० वर्षांनंतर बदलतात. जग झपाट्याने बदलत असून; विद्यार्थ्यांची आकलनशक्तीही बदलत आहे. कायदे करताना पन्नास वर्षांनंतरचे चित्र डोळ्यांसमोर ठेवावे लागणार आहे. विद्यापीठ कायदा सभागृहात संमत झाला की, तो पुढील २० वर्षे राहतो; म्हणून आपण या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात आवश्यक असलेल्या बदलांबाबत राज्यात परिसंवाद आयोजित करून त्याद्वारे येणाऱ्या सूचना, तक्रारी व अपेक्षांबाबत मते विचारात घेतली जाणार असल्याचे श्री. तावडे या वेळी म्हणाले. विद्यार्थी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदू असतो. त्यानुषंगाने नवीन कायद्यात विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला असल्याचेही शिक्षणमंत्र्यांनी सांगितले.